# ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि; हिंगोली

(मल्टीस्टेट बँक)

## बँकेच्या सर्व सन्माननीय ग्राहकांसाठी जाहीर निवेदन

या जाहीर सूचनेद्वारे ग्राहकांना विनंती करण्यात येते कि, रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार खाली नमूद केल्याप्रमाणे के.वाय.सी. बाबत पूर्तता करावी-

1. **के.वाय.सी. :** ओळखीचा पुरावा आणि अद्ययावत फोटोसह पत्त्याचा पुरावा स्थापित करण्यासाठी अधिकृत कागदपत्रे (Official Valid Documents) सादर करावीत. उदा. पासपोर्ट, वाहन परवाना, मतदान ओळखपत्र, आधारकार्ड नरेगा जॉब कार्ड, नाव आणि पत्ता असलेले राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्ट्रारने जारी केलेले पत्र, या व्यतिरिक्त पॅन कार्ड सादर करणे अनिवार्य आहे.
2. **रि-के.वाय.सी. :** जर तुमचा ग्राहक आयडी अपडेट करण्यासाठी पात्र झाला असेल आणि तुम्ही सादर केलेल्या के.वाय.सी. मध्ये कोणताही बदल झाला असेल तर आपल्या शाखेमध्ये बँकेचा छापील अर्ज भरुन द्यावा अथवा बँकेची वेबसाइट www.odpcbank.com मधून अर्ज डाउनलोड करुन माहिती भरुन बँकेत रजिस्टर्ड इमेल आयडी वरुन इमेल करावा. के.वाय.सी. मध्ये काही बदल असल्यास अद्ययावत के.वाय.सी. कागदपत्रे आणि फोटो सह आपल्या शाखेला भेट देऊन के.वाय.सी . अपडेट/रि-के.वाय.सी. प्रक्रिया पूर्ण करावी.
3. **सि- के.वाय.सी. :** प्रत्येक नवीन ग्राहकाचे बाबत, बँकेशी कोणतेही संबंध प्रस्थापित करण्यापुर्वी सि.-के.वाय.सी. प्रक्रियेची पूर्तता करणे आवश्यक आहे, तसेच रि-के.वाय.सी. साठी पात्र अशा सर्व ग्राहकांनी रि-के.वाय.सी. प्रक्रियेमध्ये सि-के.वाय.सी.ची पूर्तता करणे आवश्यक आहे.
4. नव्याने येणारे किंवा रि-के.वाय.सी. साठी पात्र झालेले कायदेशीर अस्तित्व असलेले ग्राहक (म्हणजे व्यक्तिगत व्यतिरिक्त असलेले सर्व ग्राहक) यांनी विहित नमुन्यामध्ये कायदेशीर मालकी घोषणा पत्र (Beneficial Ownership declaration Form) सादर करणे आवश्यक आहे.
5. ज्या ग्राहकांचे खाते वापर न केल्यामुळे निष्क्रीय Dormant झाले असेल त्यांनी त्यांचे खाते सुरु करण्याकरिता शाखेशी संपर्क साधावा आणि नविन फोटो व के.वाय.सी.कागदपत्रे सादर करावीत. खात्यामध्ये 2 वर्षांपेक्षा जास्त कालावधी करीता कोणताही व्यवहार झालेला नसल्यास (ग्राहक तसेच त्रयस्थ पक्षाद्वारे क्रेडिट/डेबिट व्यवहार झालेला नसल्यास) असे बचत/चालु खाते निष्क्रीय समजण्यात येईल. केवायसी पूर्तता न केलेली खाती आणि निष्क्रिय खाते गोठविण्यात येतील.
6. सर्व ग्राहकांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी याची नोंद त्वरीत बँकेत करावी.

वरील पैकी कोणत्याही औपचारिकतेचे विहित कालमर्यादेत पालन न केल्यास, त्याचे पालन होईपर्यंत, तुमचे खाते गोठवले जाईल (Debit Freeze) याची कृपया नोंद घ्यावी. के.वाय.सी. प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तुमच्या त्वरित आणि सकारात्मक प्रतिसादाची आम्ही वाट पाहत आहोत, जेणेकरुन तुम्हाला अधिक चांगली सेवा देण्यासाठी बँकेला मदत होईल.

**नामांकन नोदणी :** सर्व ठेवी धारकांना विनंती आहे की, दाव्यांचे लवकरात लवकर निपटारा करण्यासाठी शक्य तितक्या लवकर तुमच्या बँक खात्यांमध्ये नामांकन नोंदणी करण्यासाठी शाखेला भेट द्या तसेच लॉकरधारकांनी याआधी नामांकन नोंदणी केली नसल्यास कृपया तुमच्या लॉकर खात्यांमध्ये नामांकन नोंदणी करा.

व्यवस्थापकीय संचालक